# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

ईमेलद्वारे/महत्वाचे/कालमर्यादा

क्र. प्रनिप्रा/प्र.क्र.३७/प्रक्रिया शुल्क/२०२०/४४० दिनांक : 25 MAY 2021

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाची "प्रक्रिया शुल्क" अदा करण्याबाबत.

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे क्रमांक प्रनिप्रा/प्र.क्र.३७/प्रक्रिया शुल्क/२०२०/३८७, दिनांक ७/०५/२०२१ रोजीचे परिपत्रक.

विषयांकित प्रकरणी प्राधिकरणाच्या संदर्भाधीन दिनांक ७/०५/२०२१ रोजीच्या परिपत्रकाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी गतवर्षी आकारण्यात आलेल्या सुत्रानुसार प्राधिकरणाशी संबंधीत "प्रक्रिया शुल्काचा" भरणा अतितात्काळ करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते.

तथापि, सद्यस्थितीतील कोविड-१९ च्या वाढत्या पादुर्भावामुळे अनेक महाविद्यालयांनी अद्यापही प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला नाही, दरम्यान माहे मे-२०२१ मध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध संचालनालया अंतर्गत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी झालेल्या बैठकीमध्ये सदरील प्रक्रिया शुल्काचा अदा करण्यास मुदतवाढ दयावी असे निर्देश देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१/०५/२०२१ रोजी पर्यंत आपणास मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" प्राधिकरणाच्या बँक खात्यामध्ये (सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये नमूद माहितीनुसार) RTGS/NEFT द्वारे अथवा "THE SECRETARY, ADMISSIONS REGULATING AUTHORITY, MUMBAI" (Payable at Mumbai) या नावाने धनाकर्षाद्वारे अदा करण्याकरिता दिनांक ३१/०५/२०२१ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. भरणा केलेल्या शुल्काचा तपशील https://info.mahacet.org/mahacet/profees_२०२०.php या लिंकद्वारे अद्यावत करुन प्राधिकरणास त्वरीत व निश्चितपणे सादर करावा.

प्राधिकरणाकडील प्रक्रिया शुल्काचा भरणा विहित कालावधीमध्ये न केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही व तद्नुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यता प्राधिकरणाने नाकारल्यास त्याची सर्वस्वी महाविद्यालय/संस्था जबाबदारी राहील, याची कृपया गांभीर्याने दखल घ्यावी.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
व्यावसायिक अभ्यासक्रमांची संबंधीत सर्व महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-
१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२) संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई.
३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
४) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
५) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६) संचालक/सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे.

प्रत माहितीकरिता सादर,-
१) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सर्व परिक्षा समन्वयक/सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

२) परिक्षा सल्लागार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

३) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.

४) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक.

५) प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी.